# पनवेल महानगरपालिका

**सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक १९/०९/२०१७ रोजी दुपारी २.०० वाजता**

**विषय क्र. ७: मा. पालिका सदस्यांकडील कामकाज**

(४) मा. सदस्य, पनवेल महानगरपालिका श्री. परेश राम ठाकूर यांची प्रस्ताव सूचना -
०२ ऑक्टोबर २०१७ पासून प्लास्टिक पिशवी विक्रीवर बंदी करणेबाबत तसेच प्रशासनाने जनजागृती करुन याबाबत प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत.

## प्रस्तावना

पनवेल महानरगपालिका अंतर्गत पनवेल शहरात प्लास्टिकमुळे प्रचंड प्रमाणात कचरा होत आहे. तसेच प्लास्टिक मुळे रोगराई सुध्दा पसरत आहे म्हणून २ ऑक्टोबर २०१७ पासून प्लास्टिक पिशवी विक्री यावर पूर्णपणे बंदी करण्यात यावी.

सदरचा विषय महासभेच्या पटलावर घेऊन दिनांक २ ऑक्टोबर २०१७ पासून प्लास्टिक पिशव्यांचा विक्रीवर पूर्णपणे बंद करणेबाबतचा प्रस्ताव मा. सदस्य, श्री. परेश राम ठाकूर, पनवेल महानगरपालिका यांनी सादर केलेला आहे.

**सर्व साधारण महासभा दिनांक: १९/०९/२०१७ ठराव क्र. १०**

सुचकाचे नाव : श्री. परेश राम ठाकूर
अनुमोदकाचे नाव : श्रीम. कुसुम रविंद्र म्हात्रे

पनवेल महानगपालिका हद्दीमध्ये वरील प्रस्तावात सुचित केल्याप्रमाणे २ ऑक्टोंबर २०१७ पासून पूर्णपणे प्लास्टिक पिशवी विक्रीवर बंदी करणेस ही सभा मान्यता देत असून त्याबाबत पिशव्यांच्या विक्रीवर बंदी घालणेकरिता व्यापक जनजागृती मोहिम राबविणेत यावी व त्याबाबत प्रशासनामार्फत योग्य ती कार्यवाही करणेत यावी त्याकामी होणाऱ्या खर्चास ही सभा वित्तीय व प्रशासकीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही :

अनुमोदकाची सही : कुसुम रविंद्र म्हात्रे

(डॉ. कविता किशोर चौतमोल),
महापौर,
पनवेल महानगरपालिका